<u>नियमित फौजदारी खटला क्र.२५८/२०१९</u>
**<u>निशाणी क्रमांकः– ५४</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक्र ०२ यांची साक्ष शपथेवर सुरु –</u>**

माझे नावः मंदाकिनी संदिप गाडे,
वयः ३५ वर्ष, धंदाः शेती,
राहणारः रा. मायगाव देवी, ता. कोपरगाव जि. अहमदनगर.

---

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे मा.सहा.सरकारी वकीलः–</u>**
**<u>श्री. एस. जी. गाढवे यांच्या मार्फत–</u>**

१. मी फियादीला ओळखते. मी आरोपींना देखील ओळखते. घटना ही दिनांक २३–०२–२०१८ रोजी सकाळी ८.०० च्या दरम्यान आमच्या घरामध्ये घडली होती. त्यावेळी मी, फिर्यादी संजिवनी, सासरे गोपीनाथ असे आमच्या घरी होतो.

२. त्यावेळी सर्व आरोपी हे त्यांच्या हातामध्ये घरातील भांडे, कपाट, पलंग इ. वस्तू घेउन आमच्या घरी आले होते. त्यांनी आमच्या सोबत झटापट केली. त्या झटापटीमध्ये माझी व माझ्या जाउची पोत गहाळ झाली. त्यावेळी आरोपींनी मला व माझ्या जावेला हाता बुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. आरोपींनी जबरदस्तीने त्यांची भांडी आमच्या घरामध्ये ठेवली. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो होतो. माझ्या जावेने आरोपींविरुध पोलीस स्टेशन फिर्याद दिली होती. काही आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

**<u>सरतपास पूर्ण</u>**.

**उलटतपास आरोपीतर्फे विव्दान वकील श्री. बी. यु. गाडे यांच्या मार्फतः–**

३. मला आमच्या घर मिळकतीचा क्रमांक सांगता येणार नाही. भगिरथ गाडे यांच्याकडून फिर्यादीने आमची घरमिळकत विकत घेतली होती. त्या मिळकतीचे खरेदीखत झाले किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत फिर्यादी व तिच्या पतीकडून कळाले होते. आरोपी व आमच्या घराच्या दरम्यान साधारण बैलगाडी जाईल एवढा रुंद रस्ता आहे. हे मला माहीत नाही की, आरोपी हे त्यांच्या शेतामध्ये वस्ती करुन राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे घटनास्थ्ळी आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्या प्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

YOUNUS JAFAR TAMBOLI
Digitally signed by YOUNUS JAFAR TAMBOLI
Date: 2025.08.06 10:26:05 +0530

दिनांकः ०५/०८/२०२५.
कोपरगाव.

( वाय. जे. तांबोळी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोपरगाव